# नवी मुंबई महानगरपालिका
# Navi Mumbai Municipal Corporation

नमुंमपा मुख्यालय, भु. क्र.१,
किल्ले गावठाणाजवळ, पामबीच जंक्शन,
सेक्टर-१५ए, सी.बी.डी. बेलापुर
नवी मुंबई - ४०० ६१४
दुरध्वनी क्रमांकज : २७५६ ७१८१
फॅक्स क्र. : २७५६ ७१७५

NMMC Headquarter, Plot No.1,
Near Kille Gaonthan, Palmbeach Junction,
Sector-15A, C.B.D.Belapur
NAVI MUMBAI - 400 614
TEL.No. : 2756 7181
FAX : 2756 7175

**नस्ती क्रमांक:नमुंमपा/प्रशासन/आस्था-1/प्र.क्र.529/1600/2019** **जाहिरात क्रमांक : 02/2019**

## आरोग्य विभागांतर्गत वैद्यकीय अधिकारी संवर्गातील पदभरती 2019

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील आरोग्य विभागाच्या अंतर्गत **वैद्यकीय अधिकारी संवर्गातील गट-अ मधील** रिक्त पदे नामनिर्देशनाद्वारे भरावयाची आहेत. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणाऱ्या व पदाची शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवारांकडून विहीत मुदतीत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**1. न्याय वैद्यकशास्त्र तज्ञ, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 6600)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | **1** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **1** | **2** |
| सर्वसाधारण | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 2 |

**2. रक्त संक्रमण अधिकारी, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 5400)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | **1** | **1** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **2** |
| सर्वसाधारण | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |

**3. पदाचे नाव : वैद्यकशास्त्र तज्ञ, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 5400)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | **3** | **0** | **1** | **1** | **0** | **0** | **0** | **4** | **3** | **2** | **2** | **16** |
| सर्वसाधारण | 2 | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 3 | 2 | 1 | 1 | 11 |
| महिला | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 5 |
| दिव्यांगसाठीचे आरक्षणाचे 1 पद –अस्थिव्यंग-OL यांचेसाठी राखीव आहे. | | | | | | | | | | | | |

**4. पदाचे नाव :शल्य चिकित्सक, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 5400)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | **1** | **1** | **1** | **1** | **0** | **0** | **0** | **3** | **2** | **1** | **4** | **14** |
| सर्वसाधारण | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 3 | 11 |
| महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 3 |
| दिव्यांगसाठीचे आरक्षणाचे 1 पद –अस्थिव्यंग-OL यांचेसाठी राखीव आहे. | | | | | | | | | | | | |

**5. पदाचे नाव : स्त्री रोग तज्ञ, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 5400)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | **4** | **2** | **1** | **1** | **1** | **1** | **1** | **4** | **4** | **2** | **2** | **23** |
| सर्वसाधारण | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 3 | 1 | 1 | 17 |
| महिला | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 6 |
| दिव्यांगसाठीचे आरक्षणाचे 1 पद –अस्थिव्यंग-OL यांचेसाठी राखीव आहे. | | | | | | | | | | | | |

**6. पदाचे नाव : बाल रोग तज्ञ, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 5400)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | **1** | **2** | **0** | **1** | **0** | **0** | **1** | **2** | **2** | **1** | **3** | **13** |
| सर्वसाधारण | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 2 | 9 |
| महिला | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 4 |
| दिव्यांगसाठीचे आरक्षणाचे 1 पद —अस्थिव्यंग-OL यांचेसाठी राखीव आहे. | | | | | | | | | | | | |

**7. पदाचे नाव : क्ष किरण तज्ञ, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 5400)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | **1** | **1** | **1** | **0** | **0** | **0** | **0** | **2** | **2** | **1** | **4** | **12** |
| सर्वसाधारण | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 3 | 9 |
| महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 3 |
| दिव्यांगसाठीचे आरक्षणाचे 1 पद अस्थिव्यंग यांचेसाठी राखीव आहे. | | | | | | | | | | | | |

**8. पदाचे नाव : विकृतीशास्त्र तज्ञ, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 5400)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 2 | 4 |
| सर्वसाधारण | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 3 |
| महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |

**9. पदाचे नाव :इंटेन्सिव्हिस्ट, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 5400)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 4 |
| सर्वसाधारण | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 4 |

**10. पदाचे नाव :बधिरीकरण तज्ञ, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 5400)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | **1** | **1** | **1** | **1** | **0** | **0** | **0** | **2** | **1** | **1** | **1** | **9** |
| सर्वसाधारण | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 8 |
| महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 1 |
| दिव्यांगसाठीचे आरक्षणाचे 1 पद अस्थिव्यंग यांचेसाठी राखीव आहे. | | | | | | | | | | | | |

**11. पदाचे नाव : अस्थिव्यंग तज्ञ, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 5400)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | **1** | **1** | **1** | **0** | **0** | **0** | **0** | **1** | **2** | **1** | **2** | **9** |
| सर्वसाधारण | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 7 |
| महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 2 |
| दिव्यांगसाठीचे आरक्षणाचे 1 पद —अस्थिव्यंग-OL यांचेसाठी राखीव आहे. | | | | | | | | | | | | |

**12. पदाचे नाव : कान नाक घसा तज्ञ, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 5400)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | **1** | **1** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **2** |
| सर्वसाधारण | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |

**13. पदाचे नाव : नेत्र शल्य चिकित्सक, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 5400)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | **0** | **1** | **1** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **1** | **3** |
| सर्वसाधारण | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 3 |

**14. पदाचे नाव : दंतशल्य चिकीत्सक, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 5400)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | **1** | **1** | **1** | **0** | **0** | **0** | **0** | **1** | **1** | **1** | **0** | **6** |
| सर्वसाधारण | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 0 | 6 |

**15. पदाचे नाव : मेडीकल रेकॉर्ड किपर अधिकारी, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 5400)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | **1** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **1** | **2** |
| सर्वसाधारण | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 2 |

**16. पदाचे नाव :, ड्युटी मेडीकल ऑफिसर, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 5400)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | **1** | **1** | **1** | **0** | **0** | **0** | **0** | **1** | **1** | **1** | **3** | **9** |
| सर्वसाधारण | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 2 | 8 |
| महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| दिव्यांगसाठीचे आरक्षणाचे 1 पद –अस्थिव्यंग-OL यांचेसाठी राखीव आहे. | | | | | | | | | | | | |

**17. निओनाटोलॉजिस्ट (नवजात अर्भक रोगतज्ञ), गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 5400)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | **1** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **2** | **3** |
| सर्वसाधारण | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 2 |
| महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |

**18. त्वचा रोग तज्ञ, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 5400)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | **1** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **2** | **3** |
| सर्वसाधारण | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 2 |
| महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |

**19. नेफ्रॉलॉजिस्ट, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 15600-39100 + ग्रेड वेतन 5400)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **1** | **1** |
| सर्वसाधारण | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |

**20. पदाचे नाव :, कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी, गट-अ** **(वेतनश्रेणी : वेतन बँड 9300-34800 + ग्रेड वेतन 4600)**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एसईबीसी | ईडब्लुएस | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **रिक्त पदसंख्या** | **3** | **2** | **1** | **1** | **1** | **0** | **0** | **4** | **4** | **2** | **6** | **24** |
| सर्वसाधारण | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 3 | 3 | 1 | 4 | 17 |
| महिला | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 2 | 7 |
| दिव्यांगसाठीचे आरक्षणाचे 1 पद –अस्थिव्यंग-OL यांचेसाठी राखीव आहे. | | | | | | | | | | | | |

## 1. सर्वसाधारण सूचना :-

1.1 उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

1.2 वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

1.3 सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण/प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग/जिल्हा सैनिक बोर्ड कार्यालयांमध्ये नोकरीसाठी नावे नोंदविलेली असलेल्या उमेदवारांना या जाहीरातीमधील पदासाठी अर्ज करावयाचे असल्यास परीक्षेसाठी विहीत शुल्क भरुन अर्ज करणे आवश्यक राहील.

1.4 आरक्षित पदाकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी तसेच महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच नॉन क्रिमीलेअर (सन 2018-2019) मध्ये मोडत असल्याबाबत (अ.जा. व अ.ज. वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

1.5 आरक्षित पदाकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. बीसीसी-2011/प्र.क्र.1064/2011/16-ब, दि. 12-12-2011 मधील तरतूदीनूसार, याचिका क्र. 2136/2011 व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. 25-08-2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एस.एल.पी. मधील आदेशाच्या अधीन राहून तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून 06 महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा त्यांची नियुक्ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

1.6 महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. बीसीसी-2018/प्र.क्र.581ए/2018/16-ब, दि. 05/12/2018 अन्वये तसेच तदनंतर यासंदर्भात प्राप्त शासन निर्णय, आदेश, परिपत्रके आणि न्यायालयीन आदेशातील तरतूद व नियमानूसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरिता सरळसेवा भरतीसाठी विहीत केलेले आरक्षणानूसार कार्यवाही करण्यात येईल.

1.7 सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील (एसईबीसी) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग क्रमांक : सीबीसी -10/2018/प्र.क्र.130/मावक, दि. 07 डिसेंबर, 2018 अन्वये विहित करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील. तसेच, शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक : सीबीसी-प्रमाणपत्रे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील (एसईबीसी) आरक्षणाकरीता ग्राह्य धरण्यात येतील.

1.8 वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनिय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा गुणवत्तेच्या आधारावर विचार करण्यात येईल.

1.9 महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. राधाओ-4019/प्र.क्र.31/16-अ, दि. 12/02//2019 अन्वये तसेच तदनंतर यासंदर्भात प्राप्त शासन निर्णय, आदेश, परिपत्रके आणि न्यायालयीन आदेशातील तरतूद व नियमानूसार खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शासकीय सेवेत सरळसेवा भरतीसाठी विहीत केलेले आरक्षणानूसार कार्यवाही करण्यात येईल.

1.10 समांतर आरक्षणाबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण 1118/प्र.क्र.417/16-अ, दि. 28 डिसेंबर, 2018 आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या किंवा अंतिम निवडीपूर्वी या संदर्भात निर्गमित होणाऱ्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

1.11 समांतर आरक्षण हे रिक्त पदांच्या संख्येवर आधारित असल्याने उपलब्ध रिक्त संख्येनूसार महिला या समांतर आरक्षणाव्यतिरिक्त इतर समांतर आरक्षणाची पदे उपलब्ध नाहीत.

1.12 महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र-2011/प्र.क्र.4/सुधार-3, दि. 17 मार्च 2011 नुसार केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व आधिकारीता मंत्रालयाकडील दि. 17 जानेवारी, 2007 व दि. 15 मार्च, 2007 च्या अधिसूचनेनूसार केंद्र शासनाने दिव्यांगासाठी सुनिश्चित केलेल्या पदानुसार पात्रतेचे निकष धारण करणारे दिव्यांग व्यक्ती उमेदवार

गुणवत्तेनूसार पात्र असतील. तसेच दिव्यांग व्यक्ती उमेदवारांची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

1.13 महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक दिव्यांग 2018/प्र.क्र. 114/16अ, दि. 29 मे, 2019 नूसार दिव्यांग उमेदवारांसाठी आरक्षणा राहील.

1.14 दिव्यांगासाठी आरक्षित असलेली पदे एकूण भरावयाच्या पदसंख्येपैकी असतील.

1.15 दिव्यांगासाठी आरक्षित पदांवर निवड करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे याचा विचार न करता दिव्यांग व्यक्तीच्या गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची निवड करण्यात येईल.

1.16 दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षण, वयोमर्यादेचा अथवा कोणत्याही सवलतीचा फायदा घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक: अप्रकि-2012/प्र.क्र.297/आरोग्य-6, दि. 6 ऑक्टोबर, 2012 मधील आदेशानुसार SADM या संगणक प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नविन नमुन्यातील विकलांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

1.17 महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय शासन निर्णय क्र.अनियो/1005/126/सेवा-4, दि.31/10/2005 नुसार सेवेमध्ये दि.01/11/2005 नंतर नियुक्तीकरीता नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू होईल तसेच निवड झालेल्या उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार वेतन व भत्ते मिळतील.

1.18 महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005, दि. 28 मार्च 2005 च्या अधिसूचनेतील तरतुदी सर्व उमेदवारांना बंधनकारक असतील.

1.19 महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.: चारित्र्य-2117/प्र.क्र.483/2017/16-अ, दि. 28 ऑगस्ट, 2017 अन्वये पात्र उमेदवारांच्या अर्जातील माहिती असत्य असल्याचे आढळून आल्यास नियुक्तीपत्र रद्द करुन संबधित उमेदवारावार भारतीय दंडसंहितेनुसार फौजदारी कारवाई तसेच शासन सेवेसाठी कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल.

1.20 नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभाग सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, 2017 नुसार सदर पदभरती करण्यात येत आहे.

1.21 शासन निर्णय नमुंम-1217/प्र.क्र.179/17/नवि-28, दि. 22/09/2017 अन्वये निवड झालेल्या उमेदवारांसाठी 2 वर्षाचा परिविक्षाधिन कालावधी अनुज्ञेय राहील.

1.22 सेवा जेष्ठता ही निवड यादीतील प्राप्त टक्केवारीच्या गुणांच्या आधारे तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन), नियमावली, 1982 नूसार लागू राहील.

1.23 महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल ॲक्ट, 1965 (महाराष्ट्र XLVI, 1965) किंवा इंडियन मेडीकल कौन्सिल ॲक्ट, 1956 (1956 चा 102) नुसार उमेदवाराने त्याचे/तिचे नांव नोंदणी केलेले असणे अनिवार्य आहे.

1.24 उमेदवार बंधपत्रित असल्यास कॉलेजचे पत्र व परिमंडळाचे ना हरकत पत्र सादर करणे आवश्यक आहे.

1.25 शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/शासन नियंत्रित महामंडळ/प्राधिकरण/कंपनी यामध्ये कार्यरत असलेल्या उमेदवारांनी त्यांचे अर्ज योग्य त्या मार्गाने / मूळ विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतले असल्यास अशा उमेदवाराची पूर्वीची सेवा ग्राह्य धरणेबाबत विचार केला जाईल.

## 2. किमान व कमाल वयोमर्यादेबाबतच्या अटी :-

2.1 महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्र.एसआरव्ही-2015/प्र.क्र.404/कार्या-12, दि. 25/04/2016 नुसार खुला प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादा 38 वर्ष व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा 43 वर्ष राहील.

2.2 दिनांक 01/07/2019 या दिनांकास विहीत वयोमर्यादेची परिगणना करण्यांत येईल.

2.3 ज्या पदासाठी शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था इ. अनुभव बंधनकारक आहे, अशा पदासाठी नमूद केलेल्या अनुभवाच्या कालावधीइतक्या कमाल वयोमर्यादत शिथिलता दिली जाईल.

2.4 उमेदवार नवी मुंबई महानगरपालिकेत सेवेत करार/मानधन पध्दतीवर तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असल्यास अशा उमेदवारास एक वेळची विशेष बाब म्हणून त्याने संबधित पदावर महानगरपालिकेत काम केलेल्या सेवेइतका कालावधी हा जाहिरातीमधील कमाल वयोमर्यादेत सूट देण्यास ग्राह्य धरण्यात येईल.

## 3. शैक्षणिक अर्हता व अनुभव :-

3.1 आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | पदनाम | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| 1 | न्याय वैद्यकशास्त्र तज्ञ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (न्यायवैद्यक शास्त्र) एफ.एम.टी. किंवा समकक्ष पदवी<br>ब) शासकीय /निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/खाजगी रुग्णालयातील संबधित विषयातील कामकाजाचा किमान 3 वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य. तथापि, पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास संबंधित विषयातील पदविकाधारमधून सदर पद भरण्यात येईल. |
| 2 | रक्त संक्रमण अधिकारी | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (विकृती शास्त्र) किंवा समकक्ष पदवी<br>ब) एम.डी. (Transfusion Medicine) असणाऱ्यास प्राधान्य,<br>क) तथापि, पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास संबंधित विषयातील पदविकाधारमधून सदर पद भरण्यात येईल. |
| 3 | वैद्यकशास्त्र तज्ञ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (मेडीसीन) किंवा समकक्ष पदवी. |
| 4 | शल्य चिकित्सक | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.एस. (शल्य चिकित्सा) किंवा समकक्ष पदवी. |
| 5 | स्त्रीरोग तज्ञ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (स्त्री व प्रसुती रोग शास्त्र) किंवा समकक्ष पदवी. तथापि, पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास संबंधित विषयातील पदविकाधारमधून सदर पद भरण्यात येईल. |
| 6 | बालरोग तज्ञ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (बालरोग चिकित्सा शास्त्र) किंवा समकक्ष पदवी. तथ तथापि, पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास संबंधित विषयातील पदविकाधारमधून सदर पद भरण्यात येईल. |
| 7 | क्ष- किरण तज्ञ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (क्ष किरण शास्त्र) किंवा समकक्ष पदवी. तथापि, पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास संबंधित विषयातील पदविकाधारमधून सदर पद भरण्यात येईल. |
| 8 | विकृतीशास्त्र तज्ञ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (विकृती शास्त्र) किंवा समकक्ष पदवी. तथापि, पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास संबंधित विषयातील पदविकाधारमधून सदर पद भरण्यात येईल. |
| 9 | इंटेन्सिव्हिस्ट | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (मेडिसीन) व इमर्जन्सी मेडीकल किंवा तत्सम कोर्स प्रथम प्राधान्य<br>ब) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (मेडिसीन) द्वितीय प्राधान्य<br>क) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (ॲनेस्थिशिया) इमर्जन्सी मेडीकल किंवा तत्सम कोर्स तृतीय प्राधान्य<br>ड) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (ॲनेस्थिशिया) चतुर्थ प्राधान्य<br>इ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (चेस्ट) व इमर्जन्सी मेडीकल किंवा तत्सम कोर्स पंचम प्राधान्य किंवा<br>ई) ए.एम.सी.आय./महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ/डी.एम.ई.आर. या सम वरिष्ठ अभ्यासक्रम निर्देशित करणाऱ्या संस्थाच्या नियमावलीनूसार. |
| 10 | बधिरीकरण तज्ञ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (बधिरीकरण) किंवा समकक्ष पदवी. तथापि, पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास संबंधित विषयातील |
| 11 | अस्थिव्यंग तज्ञ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (अस्थिव्यंग शास्त्र) किंवा समकक्ष पदवी. तथापि, पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास संबंधित विषयातील |
| 12 | कान, नाक, घसा तज्ञ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.एस. (कान, नाक व घसा शास्त्र) ई.एन.टी. किंवा |

| | | |
|---|---|---|
| | | समकक्ष पदवी. तथापि, पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास संबंधित विषयातील पदविकाधारमधून सदर पद भरण्यात येईल. |
| 13 | नेत्रशल्य चिकित्सक | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (नेत्र शल्य चिकित्सा) किंवा समकक्ष पदवी. तथापि, पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास संबंधित विषयातील पदविकाधारमधून सदर पद भरण्यात येईल. |
| 14 | दंतशल्य चिकित्सक | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.डी.एस. (दंतशल्य चिकित्सा) पदवी.<br>ब) दंतशल्य चिकित्सा विषयातील किमान 2 वर्षांचा अनुभव. |
| 15 | मेडिकल रेकॉर्ड किपर अधिकारी | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय पदवी (एम.बी.बी.एस.)<br>ब) D.H.A. असल्यास प्राधान्य. |
| 16 | ड्युटी मेडिकल ऑफीसर | मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय पदवी (एम.बी.बी.एस.) |
| 17 | निओनाटोलॉजिस्ट (नवजात अर्भक रोगतज्ञ) | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची डी.एम.(निओनाटोलॉजी) किंवा एम.डी. पिडियाट्रिक्स व एम.डी. पिडियाट्रिक्स नंतरचा (निओनाटोलॉजी) विषयातील किमान 2 वर्षाचा अनुभव किंवा एम.डी. पिडियाट्रिक्स नंतरचा निओनाटोलॉजी विषयातील Indian Academy of Peadiatrics/Medical Council of India प्रमाणित Fellowship किंवा एम.डी. पिडियाट्रिक्स नंतरचा निओनाटोलॉजी विषयातील डी.एन.बी. (निओनाटोलॉजी) किंवा समकक्ष पदवी.<br>ब) शासकीय /निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील कामकाजाचा किमान 3 वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| 18 | त्वचा रोग तज्ञ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (त्वचारोग) किंवा समकक्ष पदवी. तथापि, पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास संबंधित विषयातील पदविकाधारमधून सदर पद भरण्यात येईल. |
| 19 | नेफ्रॉलॉजिस्ट | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (नेफ्रालॉजी)/एम.डी. (वैद्यकशास्त्र)/ डी.एन.बी. (एम.डी./एम.एस./एम.सी.एच.)<br>ब) शासकीय /निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील कामकाजाचा किमान 3 वर्षाचा अनुभव |
| 20 | कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी | मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय पदवी (एम.बी.बी.एस.) |

3.2 नियुक्ती मिळालेल्या उमेदवारास संगणक ज्ञानासंदर्भात एम.एस.सी.आय.टी.(MS-CIT) परीक्षा किंवा शासनमान्य समकक्ष परीक्षा नियुक्तीनंतर 2 वर्षात उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

3.3 मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक:- मभाप-2016/प्र.क्र.13/भाषा-2, दि. 24 मे, 2016 अन्वये उमेदवारास मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक राहील.

3.4 पदनिहाय विहीत केलेला अनुभव हा उमेदवाराने किमान शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतर प्राप्त केलेला असणे अनिवार्य आहे. किमान शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीचा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

3.5 दिनांक 01/07/2019 या दिनांकापूर्वी अथवा दिनांकास जाहिरातीत नमूद पदनिहाय शैक्षणिक व इतर अर्हताप्राप्त उमेदवारच अर्ज करण्यास पात्र ठरतील.

3.6 पदव्युतर पदवीचा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही.

## 4. शुल्क

4.1 उमेदवाराने खालीलप्रमाणे शुल्क भरणे आवश्यक राहील

(1) खुला प्रवर्ग :- रु. 300/-

(2) मागासवर्ग :- रु. 150/-

## 5. निवडीची पध्दत

5.1 प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून केवळ किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने

जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जास्त शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे किंवा अन्य निकष यांच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि/अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

5.2 पात्र उमेदवारांना मुलाखतीचा दिनांक वेळ उमेदवारांने अर्जात नमूद केलेल्या मोबाईलवर एस.एम.एस.द्वारे व ई-मेलवर अलहिदा कळविण्यात येईल. तसेच नवी मुंबई महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.nmmc.gov.in वर प्रसिध्द करण्यात येईल. तदनंतर याबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

5.3 जाहिरातीत नमूद केलेली पदसंख्या आणि पात्र उमेदवारांची संख्या लक्षात घेऊन लेखी चाचणी न घेण्याचा निर्णय आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना घेता येईल.

5.4 उमेदवाराने अर्जात दिलेल्या तपशीलाबाबत अधिक माहिती मागविण्याचा अधिकारी आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना असेल.

5.5 चाचणी परीक्षेत किमान 50% गुण मिळविण्याच्या मर्यादेच्या अधीन राहून रिक्त पदांच्या तिप्पट एवढया उमेदवारांना अथवा चाचणी परीक्षा न घेतल्यास अशा सर्व निर्देशित पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविले जाईल. अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्ग/इतर मागासवर्गीय उमेदवारांसाठी 50% ऐवजी 45% गुण मिळविण्याची अट राहील.

5.6 निवड प्रक्रिया :-

| अ.क्र. | तपशिल | एमबीबीएस शैक्षणिक अर्हता धारकांसाठी गुणांचे प्रमाण | पदव्युतर पदवी / पदविका शैक्षणिक अर्हताधारकांसाठी गुणांचे प्रमाण (weightage) |
|---|---|---|---|
| 1 | पदवी परीक्षेच्या सर्व वर्षामध्ये मिळालेले सरासरी गुण | 60% (जास्तीत जास्त 60 गुण) | लागू नाही |
| 2 | पदव्युत्तर पदविका किंवा पदव्युतर पदवी परीक्षेमध्ये मिळालेले सरासरी गुण | लागू नाही | 60% (जास्तीत जास्त 60 गुण) |
| 3 | शासन सेवेत वैद्यकीय अधिकारी या पदावर अस्थायी किंवा बंधपत्रित स्वरुपात केलेली एकूण सेवा | आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहिला 4 गुण आणि बिगर आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहिला 3 गुण याप्रमाणे जास्तीत जास्त 20 गुण | आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहिला 4 गुण आणि बिगर आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहिला 3 गुण याप्रमाणे जास्तीत जास्त 20 गुण |
| 4 | शासन सेवेत नसल्यास पदवी परीक्षा उत्तीर्ण होऊन झालेले एकूण वर्ष | प्रत्येक वर्षाला 2 गुण याप्रमाणे जास्तीत जास्त 20 गुण | प्रत्येक वर्षाला 2 गुण याप्रमाणे जास्तीत जास्त 20 गुण |
| 5 | मुलाखत<br>अ) निवड केलेल्या पदाच्या शैक्षणिक अर्हतेवर आधारित प्रश्न विचारले जातील<br>आ) ज्या पदावर नेमणूक द्यावयाची आहे त्या पदासाठी आवश्यक अनुभवास योग्य ते वेटेज दिले जाईल.<br>इ) सामाजिक प्रश्नाबाबतची जाणिव.<br>ई) सामान्य ज्ञान:- ठाणे जिल्हा विशेषत: नवी मुंबईबाबतची माहिती, भागौलिक, ऐतिहासीक माहिती विचारली जाईल.<br>उ) सेवा भरती नियमात विशेष अर्हता | 15 | 15 |

| | | | |
|---|---|---|---|
| | वा इतर कोणत्याही बाबतीत प्राधान्य नमूद असल्यास त्यासाठी आवश्यक गुण | | |
| **एकूण** | | **115** | **115** |

5.7 मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना, मुलाखतीचे वेळी सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर न केल्यास अथवा ती योग्य नसल्यास मुलाखत नाकारले जाईल यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

5.8 चाळणी परीक्षा झाल्यास त्या परीक्षेचे गुण व मुलाखतीचे गुण एकत्रितरित्या विचारात घेऊन तर चाळणी परीक्षा न झाल्यास केवळ मुलाखतीच्या गुणांच्या आधारे उमेदवाराची शिफारस करण्यात येईल.

## 6. अर्ज करण्याची पध्दत

6.1 पात्र उमेदवारांनी त्यांचे परिपूर्ण अर्ज व नमूद आवश्यक कागदपत्रे दिनांक 01/07/2019 रोजीपर्यत स्वहस्ते/पोस्टाने प्रशासन विभाग, आस्थापना शाखा क्रमांक 1, तिसरा मजला, नवी मुंबई महानपगरपालिका मुख्यालय, भू.क्र.1, किल्ले गावठाण जवळ, पामबीच जंक्शन, सेक्टर 15ए, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई 400614 येथे संध्याकाळी 5.45 वाजेपर्यत समक्ष तसेच Registered Post A. D. द्वारे सादर करावीत. अथवा healthrecruitment_2019@nmmconline.com या ई-मेल वर दिनांक 01/07/2019 रोजी रात्री 11.59 वाजेपर्यत करणे आवश्यक राहील. टपालाद्ववारे पाठविण्यात येणारे अर्ज दिनांक 01/07/2019 रोजी सायंकाळी 5.45 वाजेपर्यत प्राप्त होतील याची उमेदवाराने दक्षता घ्यावी. या कालावधीनंतर विलंबाने प्राप्त होणाऱ्या अर्जांचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही. याबाबत नवी मुंबई महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

6.2 अर्जाचा नमूना व अर्ज करण्याच्या सविस्तर सूचना नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

6.3 उमेदवाराने परीक्षा शुल्क राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राफ्ट "नवी मुंबई महानगरपालिका" किंवा "NAVI MUMBAI MUNICIPAL CORPORATION" यांच्या नावे काढून अर्जासोबत जोडावा आणि संपूर्ण भरलेला अर्ज नमुद केलेल्या आवश्यक प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती त्यासोबत जोडाव्यात. ई-मेल द्वारे अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी त्यांचे परीक्षा शुल्काचा डिमांड ड्राफ्ट अर्जाच्या छायांकित प्रतीसह अपलोड करावा तसेच टपालाद्वारे सादर करावा.

6.4 विहीत केलेल्या अर्जासोबत परीक्षा शुल्क नसल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

6.5 उमेदवाराने अर्ज सादर करताना अर्जात नमूद केलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल पत्ता सदरची भरती प्रक्रिया सुरु असेपर्यत चालू स्थितीत असणे आवश्यक आहे. सरळसेवा भरती प्रक्रियेसंबधित नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या सर्व सूचना उमेदवाराने नमूद केलेल्या मोबाईल क्रमाक व ई-मेल वर पाठविण्यात येणार आहेत. सबब, मोबाईल क्रमांक व ई-मेल पत्ता चुकीचा दिल्यास अथवा बदलल्यास त्यामूळे होणाऱ्या परिणामास नवी मुंबई महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

## 7. इतर सर्वसाधारण अटी व शर्ती

7.1 उमेदवाराने केवळ नमूद शैक्षणिक अर्हता धारण केली अथवा उमेदवाराचे निवडयादीत नाव आहे म्हणून उमेदवारास नियुक्तीचा कोणत्याही प्रकारे हक्क़ प्राप्त़ होत नाही.

7.2 निवड झालेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचा खाजगी व्यवसाय करता येणार नाही. परंतु त्यांना नियमानुसार व्यवसाय रोध भत्ता अनुज्ञेय असेल.

7.3 छाननीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी असल्याचे आढळून आल्यास संबधित उमेदवाराचा अर्ज रद्द करण्यात येईल. तसेच संबधित उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील. चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास कोणतीही पुर्वसूचना / नोटीस अथवा कारण न देता

उमेदवारास तात्काळ सेवेतून काढून टाकण्यात यईल. अशा प्रकरणी निर्माण होणाऱ्या सर्व परिणामांस संबंधित उमेदवार स्वत: जबाबदार राहील.

7.4 जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या पदसंख्येत किंवा अटी-शर्तीमध्ये बदल करण्याचा किंवा जाहिरात पूर्णपणे रद्द करण्याचा तसेच निवडप्रकियेच्या कोणत्याही स्तरावर पूर्णपणे भरती प्रक्रिया रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिकेत यांचेकडे ठेवणेत आले आहेत.

7.5 सदर निवड प्रक्रीयेच्या अनुषंगाने उपस्थित होणाऱ्या प्रश्नांबाबत आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहील.

7.6 सदरची जाहिरात नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

ठिकाण : सीबीडी बेलापूर, नवी मुंबई

दिनांक 07/06/2019

सही/-

**आयुक्त**

**नवी मुंबई महानगरपालिका**